# जिल्हाधिकारी कार्यालय,जालना

प्रशासकीय इमारत, स.नं. ४८८, जालना

(जिल्हा नियंत्रणक कक्ष)/(आपत्ती व्यवस्थापन)

दुरध्वनी क्रमांक [02482]-223132 टोल फ्री क्रमांक 1077 फॅक्स क्रमांक (02482)-226477,225326

**E-mail. rdcjalna@gmail.com, jalnaddmo@gmail.com Website: - www.jalna.gov.in, http://59.90.142.57/ddmajalna**

जा.क्र.२०२०/मशाका/जिनिक/आव्यप्र/कावि- दिनांक १८/०३/२०२०

**(ई-मेलने/टपालाने)** आपत्ती प्राधान्य

**वाचा:-**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १३/०३/२०२०.

२) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र क्र./करोना-२०२०/प्र.क्र.५८/आरोग्य-५ दिनांक १४/०३/२०२०.

३) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय मुंबई पत्र क्रमांक – करोना २०२०/प्र.क्र.५८/आरोग्य ५ दि.१८ मार्च २०२०.

**विषय:- राज्यात करोना विषाणू (कोव्हिड १९) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत. (वातानुकुलीत यंत्रणांचा वापर कमी करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना)**

**परिपत्रक**

ज्या अर्थी, आंतरराष्ट्रीय स्तरावर व देशांतर्गत नोव्हेल करोना विषाणू (nCoV 19) संसर्ग बाधित रुग्ण आढळत आहेत. तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरुन व देशांतर्गत विमान प्रवासाद्वारे व इतर प्रवास माध्यमाद्वारे प्रवासी भारतात विविध भागांत प्रवास करीत आहे. यामुळे संसर्ग वाढण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व विषाणूचे संसर्गात अधिक वाढ होवू नये म्हणून त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे आवश्यक आहे. तसेच सदर संशयित रुग्णांमुळे आपत्तीजनक परिस्थिती जालना जिल्ह्यात उद्भवू नये यासाठी साथरोग प्रतिबंधात्मक कायदा, १९८७ दिनांक १३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २, ३ व ४ मधील तरतूदीनुसार अधिसूचना निर्गमित केलेली आहे.

ज्याअर्थी, उक्त संदर्भ क्र. ३ अन्वये करोना विषाणूच्या प्रतिबंधासाठी आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून खालील आरोग्य विषयक खबरदारी घेण्याबाबत जनजागृती करण्याकरीता खालीलप्रमाणे सूचना दिलेल्या आहेत. त्यानुसार सदर परिपत्रकाप्रमाणे दिनांक ३१ मार्च २०२० या कालावधीपर्यंत जिल्हयातील सर्व शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये खालील बाबींची तात्काळ अंमलबजावणी करावी.

- श्वसनसंस्थेचे विकार असणा-या व्यक्तींशी संपर्क ठेवतांना संसर्ग न होण्याची काळजी घेणे.
- शिंकतांना व खोकतांना नाकातोंडावर रुमाल अथवा टिश्यू पेपर धरणे.
- हात वारंवार धुणे.
- अर्धवट शिजलेले कच्चे मांस न खाणे.
- फळे, भाज्या स्वच्छ धुऊन खाणे इत्यादी.

या विषाणुचा आजार व प्रसार मुख्यत्वे खोकल्यातून व शिंकण्यातून जे थेंब पडतात त्यातूनच मोठया प्रमाणावर पसरत आहे व त्या आजारात संसर्गाचे प्रमाण खुप जास्त ओ. करोना विषाणुचे शिंकण्या व खोकल्यातून उडालेले थेंब हवेतील धुलीकणांसोबत विविध वस्तुंच्या पृष्ठभागावर स्थिरावतात. मध्यवर्ती वातानुकुलन किंवा वातानुकुलीत खोलीमध्ये असे विषाणुमिश्रीत थेंबातील विषाणु जास्त कालावधीकरिता जिवंत राहतात परंतु, योग्य वायुविजन (Vantilation) किंवा तापमान जास्त असलेल्या वातावरणात हे थेंब लवकर सुकल्याने या विषाणुचा जीवन कालावधी कमी होतो व रोग प्रसारणास प्रतिबंध होतो. यास्तव वातानुकुलीत यंत्रणांचा कमितकमी वापर अथवा गरजेपुरताच वापर करुन इतर वेळी शक्यतो दरवाजे, खिडक्या उघड्या ठेवून जासतीत जास्त वायुविजन होऊ देणे हा देखील एक प्रभावी प्रतिबंधक उपाय आहे.

यास्तव जिल्हयातील सर्व कार्यालयांना वातानुकुलीत यंत्रणा न वापरणे अथवा गरजेपुरता कमितकमी वापर करण्याबाबतच्या सूचना प्रतिबंधात्मक उपाययोजनेचा भाग म्हणून याद्वारे निर्गमित करण्यात येत आहेत.

Rawt

**(रविंद्र बिनवडे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जालना**
19/3/2020

**प्रत:-**

**सर्व विभाग प्रमुख, जिल्हा जालना** यांना अनुपालनास्तव देवून सूचित करण्यात येते की, सदर परिपत्रक आपल्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांस आपल्या स्तरावरुन निर्गमीत करावे.

**प्रतिलिपी:-**

१. मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.

२. मा. संचालक, आपत्ती व्यवस्थापन प्रभाग, मत्रालय, मुंबई ३२यांचे कडेस माहितीस्तव सविनय सादर.